No. MahaREAT/Admn./**324**/2026
Date:25 April, 2026
जाहिरात क्र. ०१/२०२६

# " जाहिरात "

महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण , मुंबई कार्यालयातील खालील पदे कंत्राटी तत्वावर (११ महिन्याकरिता) भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून दि.१५/०५/२०२६ पर्यंत प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

## अर्ज करण्याचा पत्ता:

**प्रबंधक,**
**महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण,**
**पहिला मजला, वन फोर्ब्ज इमारत , डॉ. व्ही.बी.गांधी रोड,**
**काला घोडा , फोर्ट , मुंबई ४००००१.**

| अ.क्र | पदांचे नाव | पदांची संख्या | एकत्रित मासिक वेतन |
|---|---|---|---|
| १ | स्वीय सहाय्यक | ०१ | ८५०००/- |
| २ | उच्च श्रेणी लघुलेखक | ०२ | ७५३२८/- |
| ३ | निम्न श्रेणी लघुलेखक | ०१ | ६५०००/- |
| ४ | वरिष्ठ लिपिक | ०२ | ४५०००/- |
| ५ | कनिष्ठ लिपिक | ०३ | ३६०००/- |
| ६ | लिपिक | ०१ | ३६०००/- |
| ७ | अभिलेखापाल | ०१ | ४५०००/- |
| ८ | वाहनचालक | ०१ | २८०००/- |

## पात्रता :-

### १. स्वीय सहाय्यक :-

१. मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी.
२. इंग्रजी लघुलेखन १२० श.प्र.मि. व मराठी लघुलेखन १२० श.प्र.मि. उत्तीर्ण प्रमाणपत्र व इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि. व मराठी ४० श.प्र.मि. टंकलेखन उत्तीर्ण प्रमाणपत्र.
३. एमएससी-आयटी प्रमाणपत्र.

४. उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट न्यायालय, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणातील खाजगी सचिव या पदावर ५ वर्षाचा अनुभव आवश्यक

५. या पदावर नेमणूक झाल्यास अपीलीय न्यायाधिकरणाच्या न्यायिक कामामध्ये श्रुतलेखन( Dictation) घेणे क्रम प्राप्त राहील.

६. मराठी लघुलेखनाच्या जर निर्देश केलेल्या पात्रतेचे आवश्यक उमेदवार मिळाले नाही तर अश्या परिस्थितीत ज्या उमेदवारांना इंग्रजी लघुलेखन व टंकलेखन मध्ये उत्कृष्ट कामगिरी असेल अशा उचित उमेदवारांसाठी मा. अध्यक्षांना काही अटी व शर्ती शिथिल करण्याचा अधिकार राहील.

**लघुलेखन चाचणी**

**१. इंग्रजी लघुलेखन परीक्षा ७० गुण**

**२. मराठी लघुलेखन परीक्षा १० गुण**

**३. मौखिक मुलाखत २० गुण**

## २. उच्च श्रेणी लघुलेखक :-

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.

२. इंग्रजी लघुलेखन १२० श.प्र.मि. व मराठी लघुलेखन १२० श.प्र.मि. उत्तीर्ण प्रमाणपत्र व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी ४० श.प्र.मि. टंकलेखन उत्तीर्ण प्रमाणपत्र.

३. एमएससी-आयटी प्रमाणपत्र.

४. न्यायालय किंवा न्यायाधिकरणातील ५ वर्षाचा कामाचा अनुभव आवश्यक.

**लघुलेखन चाचणी**

**१. इंग्रजी लघुलेखन परीक्षा ७० गुण**

**२. मराठी लघुलेखन परीक्षा १० गुण**

**३. मौखिक मुलाखत २० गुण**

## ३. निम्न श्रेणी लघुलेखक :-

१. मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी.

२. इंग्रजी लघुलेखन १०० श.प्र.मि. व मराठी लघुलेखन १०० श.प्र.मि. उत्तीर्ण प्रमाणपत्र व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी ३० श.प्र.मि. टंकलेखन उत्तीर्ण प्रमाणपत्र.

३. एमएससी-आयटी प्रमाणपत्र.

४. न्यायालय किंवा न्यायाधिकरणातील कामाचा २ वर्षाचा कामाचा अनुभव आवश्यक.

**लघुलेखन चाचणी**

**१. इंग्रजी लघुलेखन परीक्षा ७० गुण**

**२. मराठी लघुलेखन परीक्षा १० गुण**

**३. मौखिक मुलाखत २० गुण**

**४ . वरिष्ठ लिपिक :-**

१. मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी.
२. न्यायालय किंवा न्यायाधिकरण मधील येथील ०३ ते ०५ वर्षाचा वरिष्ठ लिपिक पदाचा कंत्राटी तत्वावर किंवा नियमित कामाचा अनुभव.

**५ . कनिष्ठ लिपिक :-**

१. अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
२. अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत मराठी टंकलेखन चे ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन वेग ४० श.प्र.मि. उत्तीर्ण प्रमाणपत्र आवश्यक आहे.
३. MS-CIT प्रमाणपत्र.
४. न्यायालय किंवा न्यायाधिकरण राज्य विधी सेवा प्राधिकरण मधील लिपिक पदाचा ०२ वर्षाचा (अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत) कंत्राटी तत्वावर किंवा नियमित कामाचा अनुभव असावा.

**६ . लिपिक :-**

१. अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
२. अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत मराठी टंकलेखन चे ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन वेग ४० श.प्र.मि. उत्तीर्ण प्रमाणपत्र आवश्यक आहे.
३. MS-CIT प्रमाणपत्र.
४. न्यायालय किंवा न्यायाधिकरण किंवा राज्य विधी सेवा प्राधिकरण मधील लिपिक पदाचा ०२ वर्षाचा ( अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत) कंत्राटी तत्वावर किंवा नियमित कामाचा अनुभव असावा.

**७.अभिलेखापाल :-**

१. मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी.
२. न्यायालय किंवा न्यायाधिकरण मधील अभिलेखा विभागातील ०२ वर्षाचा कंत्राटी तत्वावर किंवा नियमित कामाचा अनुभव.

**८.वाहनचालक :-**

१. उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२. उमेदवाराकडे मोटार वाहन अधिनियम १९८८ (क्र.५९/१९८८) प्रमाणे वैध व प्रभावीपणे कार्यरत असा किमान हलके मोटार वाहन (LMV) चालवण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) अर्ज सादर केलेल्या दिनांकापासून असावा.

३. अर्ज केलेल्या तारखेस उमेदवाराजवळ किमान ७ वर्षे हलके आणि/किंवा जड मोटार वाहन चालविण्याचा अनुभव असावा.

४. उमेदवाराचा पूर्व कार्यकाळ (रेकॉर्ड) वाहनचालक म्हणून स्वच्छ असावा.

५. उमेदवारास मोटर वाहनाची देखभाल व सर्वसाधारण दुरूस्तीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६. उमेदवारास मुंबई शहराची प्रादेशिक रचना (Topography) याची माहिती असावी.

७. उमेदवार शारीरिक दृष्ट्या सक्षम,सुदृढ व निर्व्यसनी असावा.

८. चार चाकी मोटर वाहनाची देखभाल आणि किरकोळ दुरूस्ती या दोन्हीचा अधिकतम अनुभव आणि कार्यरत ज्ञान असणे आवश्यक आहे.

९. निवड झालेल्या उमेदवाराची प्रथम वैद्यकीय चाचणी केली जाईल. सक्षम अधिकाऱ्याने वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणित केल्यावरच त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

१०. वाहन चालवण्याव्यतिरिक्त शिपाई पदाची कामे व इतर कार्ये करणे बंधन कारक राहील.

**टिप-**

१. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे . शैक्षणिक अर्हता , अनुभव, टंकलेखन , संगणक याबाबतच्या प्रमाणपत्राच्या सत्य व स्पष्ट प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज बाद ठरविण्यात येतील याची अर्जदारानी नोंद घ्यावी. अर्जदाराने आपले अर्ज पोस्टने , कुरीअर किंवा वैयक्तिक दि. १५/०५/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठवावे व त्या तारखेनंतर येणारे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाही आणि ते बाद ठरविण्यात येतील.

२. अर्ज पाठवताना अर्जदाराने पाकिटावर कोणत्या पदासाठी अर्ज करीत आहे हे ठळक अक्षरात लिहावे.

३. निवड झालेल्या उमेदवारांची सुरुवातीची नियुक्ती ही ११ महिन्यांच्या कालावधीकरिता असेल तदनंतर उमेदवाराच्या कामाची गुणवत्ता आणि उरक पाहूनच उमेदवारास पुढील कालावधींकरिता म्हणजे २ वेळा ११-११ महिन्याची पुन: नियुक्ती कंत्राटी तत्वावर देण्यात येईल.

४. महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण, मुंबई मधील कार्यरत कर्मचारी योग्य त्या पदास आणि पात्रतेनुसार अर्ज सादर करू शकतात.

Maharashtra Real Estate Appellate Tribunal

**प्रबंधक,** २४/४/२६
**महाराष्ट्र स्थावर संपदा अपिलीय न्यायाधिकरण**